महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अतंर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा नागरीकांना पुरविण्यासाठी महाऑनलाईन लि. यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः ईजीव्ही-२०१८/प्र.क्र.०६/ई-गव्हर्नन्स
गो.ते.रुग्णालय आवार, संकुल इमारत,
८ वा मजला, मुंबई- ४०० ००१,
तारीख: ४ एप्रिल, २०१८.

<u>वाचा-</u>

१) माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभाग, शासन निर्णय क्रमांक:-मातंस ०१७/७१/२०१५- ०/ ० DIT(MH),दिनांक १४ जानेवारी,२०१६

२) शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र:संकीर्ण-२०१७/प्र.क्र.६६/सम-२, दिनांक ४ जानेवारी,२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अतंर्गत दि.०४/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये सात लोकसेवा अधिसूचित केल्या आहेत. त्याचप्रमाणे लोकसेवा अधिनियमांअतर्गत ऑनलाईन सेवा अधिसूचित करण्यासंदर्भात, महाऑनलाईन लिमिटेड यांना सिस्टम इंटीग्रेटर म्हणून घोषित करण्यात आले असून, प्रती सेवा दर निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर लोकसेवा नागरीकांना पुरविण्यासाठी महाऑनलाईन लि. यांच्याकडून करण्यात येणाऱ्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा विकसित, एकत्रीकरण इत्यादी सेवा महाऑनलाईन लिमीटेड यांच्याकडून घेण्यास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

Sr. No.	**Name of Service**	**Services Provided by Mahaonline Ltd.**	**Cost Per Services**
1	**2**	**3**	**4**
1	Software Assessment for Disability (SADM)-Disability Certificate	(1) Application Development (2) Database and Infra Support (3) SMS Gateway (4)Hardware Integration (5) Server Maintenance (6) Payment Gateway (7) AMC Application Support (8) Report Generation (9) Application Hosting (10) ProjectCo-ordination	Rs. 20 + GST (माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाने ठरविलेल्या दरानुसार)
2	Registration of Nursing Home		
3	Registration of Genetic Counseling Centre, Genetic laboratory or Genetic clinic, Ultra Sound Clinic or Imaging Centre under section 18 of PCPNDT Act 1994		
4	Registration / Reregistration of Hospitals Under Section 15 of human Organs Transplantation On Act 1994		

२. सदर प्रस्तावावरील खर्च, मागणी क्र. आर-२, २२५१, सेक्रेटरिएट--- समाजिक सेवा, (०१) (०४) ई-गव्हर्नन्स अंतर्गत ऑनलाईन ई-सेवा (२२५१ ०६९७), या लेखाशिर्षाखालील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. सीओएम-१००१/प्र.क्र.१७४/०१/३९, दि.२९/१०/२००१ मधील परिशिष्ट ७.३ अनुसार आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि. १७.०४.२०१५ च्या परिशिष्टामधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ तील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक-चार परिच्छेद क्र.२७(२) अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११४०१५०५२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.04.04 17:26:07 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान , मुंबई.
३) संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय,मुंबई.
४) अतिरिक्त संचालक (कुटुंब कल्याण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) अतिरिक्त संचालक (असंसर्गजन्य आजार), पूणे.
६) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
८) मे. महाऑनलाईन लि., ५ वा मजला, ट्रेड वर्ल्ड, “डी” विंग, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३.
९) निवड नस्ती (ई-गव्हर्नन्स).